विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

९९३ पदांच्या भरतीचे श्रेय नेमके कुणाचे?

## आजी - माजी आमदारांच्या श्रेयवादात महापौर-उपमहापौरांची एन्ट्री

### १४ ऑगस्टला मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनानंतर १९ ऑगस्टला शासनाची मंजुरी

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेतील मंजूर आकृतिबंधानुसार ९९३ पदांच्या सेवाप्रवेश व सेवा वर्गीकरण नियमांना राज्य शासनाने मंजुरी दिल्यानंतर या निर्णयाचे श्रेय घेण्यासाठी राजकीय चढाओढ सुरू झाली आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आपल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याचा दावा केला, तर माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सेवा प्रवेश नियमांना मंजुरी मिळाल्याचे सांगितले आहे. त्यावर भाजपकडून खोतकरांच्या पूर्वीच्या मनपा विरोधी भूमिकेच्या अनुषंगाने प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

मात्र, या सर्व श्रेयवादात आता जालना महापालिकेच्या महापौर वंदना मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांची भूमिकाही चर्चेत आली आहे. विशेष म्हणजे, १४ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जालना दौऱ्यावर आले असताना महापौर वंदना मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांनी त्यांची भेट घेऊन ९९३ पदांच्या सेवा प्रवेश नियमांना तत्काळ मंजुरी देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली होती. त्यानंतर अवघ्या पाच दिवसांनी, १९ ऑगस्ट रोजी नगरविकास विभागाने संबंधित नियमांना मंजुरी दिली. त्यामुळे या कालक्रमाकडे पाहता महापौर-उपमहापौरांचा पाठपुरावाही श्रेयवादात महत्त्वाचा ठरत आहे.

**१४ ऑगस्टचे निवेदन, १९ ऑगस्टला निर्णय**

जालना महानगरपालिकेच्या सक्षमीकरणासाठी महापौर वंदना मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात विविध मागण्या मांडल्या होत्या. त्यातील पहिली आणि महत्त्वाची मागणी होती ती म्हणजे महापालिकेच्या ९९३ मंजूर पदांसाठी सेवा प्रवेश नियमांना तातडीने मंजुरी देण्याची. महापालिका अस्तित्वात आल्यानंतर उपलब्ध मनुष्यबळावर मोठ्या प्रमाणात प्रशासकीय कामकाज सुरू असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले होते. ११ सप्टेंबर २०२५ रोजी ९९३ पदांचा आकृतिबंध मंजूर झालेला असतानाही सेवा प्रवेश नियम मंजूर नसल्यामुळे रिक्त पदांची भरती रखडली असल्याचेही महापौर-उपमहापौरांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. या मागणीनंतर १९ ऑगस्ट रोजी




नगरविकास विभागाने 'जालना शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२६' यांना मंजुरी दिली. त्यामुळे ९९३ पदांच्या भरतीसाठी आवश्यक असलेली महत्त्वाची प्रशासकीय प्रक्रिया पुढे सरकली आहे.

**आता प्रश्न, श्रेय कुणाचे?**

एकीकडे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या समर्थकांकडून सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा दावा केला जात आहे. दुसरीकडे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी मुख्यमंत्री फडणवीस, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री बबनराव लोणीकर, भाजप जिल्हाध्यक्ष नारायण कुचे आणि आमदार संतोष दानवे यांच्या माध्यमातून भरतीचा प्रश्न शासनाकडे लावून धरल्याचे सांगितले आहे. भाजपकडून मात्र खोतकरांच्या पूर्वीच्या भूमिकेवरच प्रश्न उपस्थित करण्यात आला असून, महापालिका निर्मितीला विरोध करणाऱ्यांनी आता पदभरतीच्या निर्णयाचे श्रेय घेऊ नये, अशी टीका करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर महापौर आणि उपमहापौरांनी दिलेले १४ ऑगस्टचे निवेदन महत्त्वाचे ठरते. कारण मुख्यमंत्री जालना दौऱ्यावर असताना प्रत्यक्ष भेट घेऊन '९९३ पदांच्या सेवा प्रवेश नियमांना तत्काळ मंजुरी द्यावी' अशी मागणी करण्यात आली आणि त्यानंतर पाच दिवसांत शासन निर्णय जारी झाला.

**महापौर-उपमहापौर सरस ठरले का?**

राजकीय श्रेयवादाचा कालक्रम पाहिला तर हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. आमदार आणि माजी आमदार आपल्या पाठपुराव्याचे श्रेय घेत असताना महापौर आणि उपमहापौरांनी निर्णयाच्या अगदी आधी मुख्यमंत्र्यांसमोर हा मुद्दा थेट मांडला आणि त्यानंतर शासनाने निर्णय घेतला असेल, तर 'या निर्णयासाठी प्रत्यक्ष महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांचा पाठपुरावा अधिक निर्णायक ठरला का?' असा सवाल निर्माण होतो.

मात्र, केवळ १४ ऑगस्टच्या निवेदनानंतर १९ ऑगस्टला निर्णय झाला म्हणून अंतिम श्रेय महापौर-उपमहापौरांचेच, असे ठामपणे म्हणणेही तितकेच घाईचे ठरेल. कारण शासन निर्णयाची प्रक्रिया त्यापूर्वीपासूनच प्रशासकीय स्तरावर सुरू असण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणाचा पाठपुरावा किती निर्णायक ठरला, हे स्पष्ट करण्यासाठी संबंधित पत्रव्यवहार, प्रस्तावांची तारीख आणि शासनस्तरीय नोंदी समोर येणे आवश्यक आहे.

तरीही १४ ऑगस्टचे निवेदन आणि १९ ऑगस्टचा शासन निर्णय यातील अवघा पाच दिवसांचा कालावधी हा राजकीय चर्चेसाठी निश्चितच महत्त्वाचा आहे.

९९३ पदांच्या निर्णयामुळे जालना महानगरपालिकेला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, नगररचना, कर वसुली, अभियांत्रिकी, अग्निशमन यांसारख्या विभागांवरील मनुष्यबळाचा ताण कमी होण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर (पान २ वर)

## एमपीडीएअंतर्गत फरार महिला गुन्हेगार अखेर पोलिसांच्या जाळ्यात

*गावठी हातभट्टीची दारू तयार करण्याच्या प्रकरणातील सराईत लक्ष्मीबाई पवार हिला एक वर्षासाठी स्थानबद्ध*

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील गावठी हातभट्टीची दारू तयार करण्याच्या प्रकरणात रेकॉर्डवरील सराईत महिला गुन्हेगारावर पोलिसांनी महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले व इतर धोकादायक व्यक्तींच्या विघातक कृत्यांना आळा घालण्यासाठीच्या कायद्यानुसार (एमपीडीए) प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. लक्ष्मीबाई रमेश पवार (रा. कैकाडी मोहल्ला, जुना जालना) हिला एक वर्षासाठी मध्यवर्ती कारागृह हर्सल, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानबद्धतेचे आदेश दिल्यानंतर संबंधित महिला पोलिसांच्या हाती लागत नव्हती. तब्बल काही महिने फरार असलेल्या लक्ष्मीबाई पवार हिचा पोलिसांनी शोध घेतला. अखेर ती कुटुंबीयांना भेटण्यासाठी घरी येणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून तिला ताब्यात घेतले.

जालना शहरातील सराईत गुन्हेगारांवर प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांनी दिले आहेत. त्यानुसार कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांनी गावठी हातभट्टीची दारू (पान २ वर)

## जालन्यात अवैध शस्त्रांचा साठा; पिस्टल, रिव्हॉल्व्हर अन् दोन तलवारी जप्त

स्थानिक गुन्हे शाखेची एकाच दिवशी तीन ठिकाणी कारवाई; तीन तरुण जेरबंद, ५८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली असून, स्थानिक गुन्हे शाखेने दि. १९ ऑगस्ट रोजी तीन वेगवेगळ्या कारवायांमध्ये एक गावठी पिस्टल, एक देशी रिव्हॉल्व्हर आणि दोन धारदार तलवारी जप्त केल्या. या कारवाईत तीन तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, एकूण ५८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



जिल्ह्यात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी पथक तयार करून कारवाईसाठी मार्गदर्शन केले.

दि. १९ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांचा शोध घेत असताना प्रथमेश बालाजी कदम (वय १९, रा. खरपुडी, जालना) याच्याकडे विनापरवाना गावठी पिस्टल असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी खरपुडी येथून त्याला ताब्यात घेत त्याच्याकडून ३५ हजार रुपये किमतीचे एक गावठी पिस्टल जप्त केले. याप्रकरणी तालुका पोलीस ठाणे, जालना येथे संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याच दिवशी दुसऱ्या कारवाईत राजेश दीपक पांजगे (वय २४, रा. मधुबन कॉलनी, जालना) हा देशी रिव्हॉल्व्हर बाळगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जालना शहरातील बसस्थानकासमोरील रस्त्यावरून राजेश पांजगे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून २० हजार रुपये किमतीचा एक देशी रिव्हॉल्व्हर जप्त करण्यात आला. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात (पान २ वर)

दोन हजार सदस्यांकडून २० लाख उकळल्याचा आरोप

## 'विश्वमंगल'च्या नावाखाली कामगारांचे 'अमंगल'!

### कामगार जोडले, पैसे जमा केले; पगार मात्र गायब!; परतूरच्या महिलेची सदर बाजार पोलिसांत तक्रार

**जालना - प्रतिनिधी**

बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना असल्याचे सांगून सदस्य नोंदणीच्या माध्यमातून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. 'विश्वमंगल असंघटित कामगार संघटना' या संस्थेच्या माध्यमातून साखळी पद्धतीने बांधकाम कामगारांची सदस्य नोंदणी करून घेतल्याचा आणि त्यांच्याकडून प्रत्येकी एक हजार रुपये जमा केल्याचा दावा परतूर येथील एका ४० वर्षीय महिलेने केला आहे. तब्बल २ हजार सदस्यांकडून सुमारे २० लाख रुपये जमा करून घेतल्याचा आरोप तिने केला असून, संबंधित रक्कम परत मागितल्यानंतर आपल्याला शिवीगाळ करून धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद केले आहे.

या प्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात संतोष रामभाऊ इंगळे, दगडू उत्तम खुळे आणि रवि मारोती प्रधान यांच्याविरुद्ध तक्रार दाखल झाली आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता () मधील कलम ३१८(४), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल केल्याची माहिती उपलब्ध नोंदीतून समोर आली आहे.

तक्रारदार महिलेने दिलेल्या जबाबानुसार, ऑगस्ट २०२३ च्या सुमारास संतोष रामभाऊ इंगळे, दगडू उत्तम खुळे आणि रवि मारोती प्रधान हे तिघे परतूर येथे आले होते. यावेळी त्यांनी 'विश्वमंगल असंघटित कामगार संघटना' या संस्थेची जाहिरात आणि सदस्य नोंदणी करण्यासाठी आल्याचे सांगितले.

याच काळात तक्रारदार महिलेची संबंधित तिघांशी ओळख झाली. त्यांनी संस्थेच्या (पान २ वर)

### 'पोलिसांनी सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे' - आमदार बबनराव लोणीकर

असंघटित कामगारांच्या नावाने करण्यात आलेल्या कथित गैरप्रकाराच्या तक्रारीची पोलिसांनी गांभीर्याने दखल घेऊन सखोल आणि निष्पक्ष चौकशी करावी, अशी प्रतिक्रिया आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली आहे. ऑफलाइन पद्धतीने कामगारांची नोंदणी करून आर्थिक गैरप्रकार झाल्याचे आरोप समोर येत असतील, तर हे प्रकरण गंभीर असून त्यामागील संपूर्ण सत्य पोलिसांनी तपासातून समोर आणणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. लोणीकर म्हणाले की, कामगारांच्या नावावर कोणत्याही प्रकारची फसवणूक किंवा आर्थिक गैरव्यवहार झाला असेल, तर तो अत्यंत गंभीर प्रकार आहे.



त्यामुळे संबंधित संघटनेचे कामकाज, कामगारांची नोंदणी, त्यांच्याकडून घेण्यात आलेली रक्कम, पावत्या, बँक व्यवहार तसेच इतर आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी करण्यात यावी. तसेच या प्रकरणात कोणकोणत्या व्यक्तींचा सहभाग आहे, किती कामगारांची नोंदणी करण्यात आली, त्यांच्याकडून किती रक्कम जमा करण्यात आली आणि ती रक्कम नेमकी कुठे वापरण्यात आली, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. तपासात दोष आढळून आल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी आणि पीडित कामगारांना न्याय मिळवून द्यावा, असेही आमदार लोणीकर यांनी म्हटले आहे.

## महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचे सुधारित वेळापत्रक जाहीर; अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबरला

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. या प्रक्रियेनंतर राज्यातीलअंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणारअसल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. पात्र मतदारांची नावे मतदार यादीत अचूकपणे समाविष्ट व्हावीत तसेच मतदार यादीच्या शुद्धतेत आणि पारदर्शकतेत सुधारणा व्हावी, या उद्देशाने ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेसाठी ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीखनिश्चित करण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार, मतदार केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना करण्याची प्रक्रिया२४ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्णकरण्यात येणार आहे. त्यानंतर३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्धकेली जाईल. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांना आपल्या नावाची नोंद तपासण्याची तसेच आवश्यक असल्यास दावे व हरकती दाखल करण्याची संधी मिळणार आहे.

प्रारूप मतदार यादीसंदर्भात ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. त्याचबरोबर ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६या कालावधीत प्राप्त दावे व हरकतींबाबत नोटिसा देणे तसेच त्यांची सुनावणी व निपटारा करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. विशेष सखोल पुनरिक्षणाच्या या संपूर्ण प्रक्रियेत पात्र मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासोबतच अपात्र किंवा चुकीच्या नोंदींबाबत प्राप्त होणाऱ्या दावे-हरकतींची छाननी केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आपले नाव, पत्ता आणि इतर आवश्यक तपशील तपासून पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दावे व हरकतींच्या प्रक्रियेनंतर आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करून४ नोव्हेंबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.भारत निवडणूक आयोगाने हे सुधारित वेळापत्रक जाहीर केले असून, त्यानुसार मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाची संपूर्ण प्रक्रिया पार पडणार आहे. मतदारांनी या प्रक्रियेदरम्यान आपली नोंद तपासून आवश्यक त्या दुरुस्त्या किंवा हरकती वेळेत नोंदवाव्यात, असे आवाहन निवडणूक यंत्रणेकडून करण्यात आले आहे.

# संपादकीय...

## राजकारण असावे, पण जालन्याच्या हिताचे

जालना शहर महानगरपालिकेतील ९९३ मंजूर पदांच्या सेवाप्रवेश व सेवा वर्गीकरण नियमांना राज्य शासनाने मंजुरी दिल्यानंतर जालना शहरातील राजकारण पुन्हा एकदा श्रेयवादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या समर्थकांकडून हा निर्णय त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित असल्याचा दावा केला जात आहे, तर भाजपकडून महापालिका निर्मितीला पूर्वी विरोध करणाऱ्यांनी आता पदभरतीच्या निर्णयाचे श्रेय घेऊ नये, असा पलटवार करण्यात आला आहे. मुळात हा वाद केवळ ९९३ पदांचा नाही. हा वाद जालना महानगरपालिका नेमकी कोणाच्या राजकीय इच्छाशक्तीमुळे सक्षम होणार, याचा नाही; तर महानगरपालिका निर्माण झाल्यानंतर ती प्रत्यक्षात सक्षम करण्यासाठी कोण किती गंभीर आहे, याचा आहे. महापालिका स्थापन झाली. आकृतिबंध मंजूर झाला. आता सेवा प्रवेश नियमांनाही मंजुरी मिळाली. या तिन्ही प्रक्रिया स्वतंत्र प्रशासकीय टप्पे आहेत. त्यामुळे प्रत्येक टप्प्याचे श्रेय एखाद्या एका राजकीय व्यक्तीला देणे किंवा संपूर्ण निर्णयाचे श्रेय एका पक्षाने घेणे, हे वस्तुस्थितीचे अतिसुलभीकरण ठरेल.

११ सप्टेंबर २०२५ रोजी जालना महानगरपालिकेसाठी ९९३ पदांचा आकृतिबंध मंजूर करण्यात आला होता. म्हणजेच किती मनुष्यबळ आवश्यक आहे, याची शासनस्तरावर चौकट आधीच निश्चित झाली होती. मात्र, आकृतिबंध मंजूर होणे आणि त्या पदांवर प्रत्यक्ष भरती होणे यात मोठा फरक आहे. पदांची निर्मिती झाली म्हणून लगेच जाहिरात काढता येत नाही. संबंधित सेवा प्रवेश नियम, पदांची पात्रता, नियुक्तीची पद्धत, संवर्गनिहाय व्यवस्था आणि इतर प्रशासकीय बाबींना मान्यता आवश्यक असते. १९ ऑगस्ट २०२६ रोजी सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियमांना शासनाने मंजुरी दिल्यामुळे आता या प्रक्रियेतील महत्त्वाचा अडथळा दूर झाला आहे. त्यामुळे या निर्णयाचे खरे महत्त्व 'भरतीला परवानगी' एवढेच नसून महापालिकेच्या प्रशासकीय यंत्रणेला कायदेशीर आणि संस्थात्मक चौकट मिळणे, हे आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या पाठपुराव्यामुळे निर्णय झाला, असा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे. शासनाच्या पातळीवर एखादा प्रस्ताव पुढे नेण्यासाठी लोकप्रतिनिधी पाठपुरावा करतात, बैठका घेतात, संबंधित मंत्र्यांकडे मागणी करतात आणि प्रशासनाला गती देण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे पाठपुरावा केला असेल तर त्याचे श्रेय घेणे हे राजकारणात अनोखे नाही. पण येथे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतोपाठपुरावा नेमका कोणत्या टप्प्यावर झाला आणि शासनाचा निर्णय कोणत्या प्रशासकीय प्रक्रियेतून झाला? याचे अधिकृत दस्तऐवज, पत्रव्यवहार आणि कालानुक्रमिक माहिती सार्वजनिक झाली तर श्रेयवादाला वस्तुनिष्ठ आधार मिळू शकतो. अन्यथा 'माझ्यामुळे झाले' आणि 'त्यांच्यामुळे झाले नाही' या दोन दाव्यांमध्ये जालनेकरांचे मूळ प्रश्न बाजूला पडतील. दुसरीकडे भाजप नेत्यांनी उपस्थित केलेला प्रश्नही राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा आहे. महापालिका निर्मितीच्या काळात जर एखाद्या नेत्याने तिच्या स्थापनेला विरोध केला असेल, कर वाढीबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली असेल किंवा महानगरपालिका व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले असतील, तर आज त्याच व्यवस्थेतील पदभरतीच्या निर्णयाचे श्रेय घेताना त्या पूर्वीच्या भूमिकेचे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.

# जलसंधारण : जलसमृद्ध, दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा भक्कम पाया – संजय राठोड

पाणी म्हणजे शेतीचा श्वास आणि विकासाचा आधार आहे. बदलते हवामान आणि घटती भूजल पातळी यामुळे जलसंधारणाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे जतन करून तो जमिनीत मुरवणे, ही काळाची गरज आहे. जलसंधारणातून मातीला नवजीवन, शेतीला आधार आणि भावी पिढ्यांना सुरक्षित भविष्य देण्याची ताकद आहे. महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर असून, त्यापैकी १७४.७३ लाख हेक्टर क्षेत्र शेतीखाली आहे. राज्यातील सुमारे ८२ टक्के शेती पावसावर अवलंबून असल्याने पावसाच्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. राज्यातील २४१ लाख हेक्टर क्षेत्र पाणलोट विकासासाठी पात्र असून, त्यापैकी १८२.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर मृद व जलसंधारणाची विविध कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित क्षेत्रावरही नियोजनबद्ध पद्धतीने कामे सुरू आहेत. महाराष्ट्र शासनाने जलसंधारणाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून विविध प्रभावी योजना राबविल्या आहेत आणि राबवत आहे. राज्याला जलसुरक्षिततेच्या दिशेने सक्षमपणे पुढे नेण्यासाठी मृद व जलसंधारण विभाग सातत्याने कार्यरत असून जलस्रोतांचे संवर्धन, भूजल पुनर्भरण, विकेंद्रित जलसाठ्यांची निर्मिती आणि शाश्वत जलव्यवस्थापनाला प्राधान्य दिले जात आहे.

**जलयुक्त शिवारातून गावांच्या जलसमृद्धीकडे**

जलयुक्त शिवार अभियानामुळे राज्यातील अनेक गावांमध्ये जलसाठे वाढले, विहिरींच्या पाणीपातळीत सुधारणा झाली आणि संरक्षित सिंचनाला चालना मिळाली. ज्या शेतकऱ्यांना पूर्वी वर्षातून एकच पीक घेता येत होते, अशा अनेक भागांत दुबार पिकांच्या संधी निर्माण झाल्या आहेत. जलसंधारणामुळे निर्माण होणारे संरक्षित सिंचन केवळ शेतीपुरते मर्यादित राहत नाही, तर ग्रामीण बाजारपेठ, रोजगार, दुग्धव्यवसाय आणि लघुउद्योगांनाही चालना देते. जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील यशानंतर जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत राज्यातील ५,८५८ गावांमध्ये सुमारे १.४३ लाखांहून अधिक कामे प्रस्तावित झाली आहेत. त्यापैकी १.२४ लाखांपेक्षा अधिक कामे पूर्ण झाली आहेत. जुलै २०२६ अखेर या अभियानावर २,३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी खर्च करण्यात आला आहे.

**गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार-पाण्यासोबत मातीलाही नवजीवन**

'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' ही योजना पर्यावरण आणि शेती यांचा सुंदर समन्वय साधणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे पाणीसाठवण क्षमता वाढते, तर तोच सुपीक गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची गुणवत्ता आणि उत्पादन क्षमता सुधारण्यास मदत होते. २०२३-२४ ते २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३,३०५ जलाशयांमधून ९८०.५० लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला असून, तो सुमारे १ लाख ९३ हजार एकर क्षेत्रावर पसरविण्यात आला आहे. यासाठी सुमारे ३४५ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, ८१,११४ स.घ.मी. पाणीसाठा पुनर्स्थापित झाला आहे. म्हणजेच जलसंधारण हे शेतीला केवळ पाणी देत नाही, तर जमिनीलाही नवजीवन देते.

**भूजल पुनर्भरण-भविष्याच्या जलसुरक्षेची गुरुकिल्ली**

भूजल पुनर्भरण हा जलसंधारणाचा अत्यंत महत्वाचा नैसर्गिक फायदा आहे. गेल्या काही दशकांत भूजलाचा मोठ्या प्रमाणावर उपसा झाल्यामुळे अनेक भागांत विहिरी कोरड्या पडणे, बोअरवेलची खोली वाढणे आणि उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता कमी होणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. याचा शेतीसोबतच संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होतो. पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवून जमिनीत मुरविले, तर भूजल पातळी सुधारण्यास मदत होते. ही प्रक्रिया केवळ शेतीसाठी नव्हे, तर पिण्याच्या पाण्याच्या दीर्घकालीन उपलब्धतेसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे. भविष्यातील गंभीर पाणीटंचाईचे संकट टाळायचे असेल, तर भूजल संवर्धन आणि पुनर्भरणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

**जलसंधारण म्हणजे पर्यावरणाचेही संवर्धन**

जलसंधारणाचा पर्यावरणावरही अत्यंत सकारात्मक परिणाम होतो. एखाद्या भागात पाणी टिकून राहिले, तर तेथील जैवविविधतेला आधार मिळतो. वृक्षसंवर्धनाला चालना मिळते, जमिनीतील ओलावा टिकतो आणि नैसर्गिक परिसंस्था मजबूत होण्यास मदत होते. अनेक ठिकाणी जलसंधारणाच्या कामांनंतर स्थानिक जैवविविधता आणि जलचरांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याची उदाहरणे दिसून येतात. त्यामुळे जलसंधारण ही केवळ विकासाची योजना नसून निसर्गाशी असलेले आपले नाते अधिक दृढ करण्याची प्रक्रिया आहे.

हवामान बदलाच्या आव्हानाला जलसंधारणाचे उत्तर आज हवामान बदल हे जगासमोरील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक आहे. पावसाचे स्वरूप बदलत आहे. काही दिवसांत अतिवृष्टी आणि त्यानंतर दीर्घ काळ पावसाचा खंड असे चित्र अनेक भागांत दिसून येते. अशा परिस्थितीत केवळ मोठी धरणे किंवा पारंपरिक सिंचन व्यवस्था पुरेशी ठरणार नाही. गाव पातळीवर पाणी अडवणे, पाणलोट विकास करणे, नैसर्गिक जलमार्ग जिवंत ठेवणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे आणि स्थानिक जलस्रोत मजबूत करणे हा शाश्वत मार्ग आहे. हवामान बदल आणि पर्जन्यमानातील अनिश्चिततेचा विचार करून मृद व जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि लघु सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती दिली आहे. आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यावरही भर दिला जात आहे. गुणवत्तापूर्ण कामे आणि कालबद्ध अंमलबजावणी या सर्व उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाची महत्वपूर्ण भूमिका आहे. विभागाच्या नव्या प्रशासकीय आकृतिबंधाला मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्पांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळाली आहे. मंजूर कामे मूळ आराखड्यानुसार आणि निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. गुणवत्तापूर्ण कामांसाठी स्वतंत्र मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या असून, मालगुजारी तलावांच्या पुनरुज्जीवनासारख्या महत्त्वाच्या उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसंधारण अधिक परिणामकारक करण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे.

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून ५.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर कामे**

केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये १४० प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या माध्यमातून सुमारे ५.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर जलसंधारण, भूजल पुनर्भरण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेला चालना देणारी विविध कामे सुरू आहेत. या योजनेचे एकूण प्रकल्पमूल्य

१,२५१.११ कोटी रुपये असून, जुलै २०२६ अखेर सुमारे १,००३ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन, सिमेंट बंधारे, पाणलोट विकास, नाला खोलीकरण, भूजल पुनर्भरण आणि लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या जलसंवर्धन उपक्रमांची प्रभावी सांगड घालत महाराष्ट्र जलसुरक्षिततेच्या दिशेने भक्कम वाटचाल करत आहे. नाला खोलीकरणाबरोबरच बांबू लागवडीसारख्या पर्यावरणपूरक उपक्रमांवरही भर देण्यात आला आहे. विदर्भातील मालगुजारी तलावांची कामे वेळेत पूर्ण करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा दृष्टिकोन केवळ पाणी साठविण्यापुरता मर्यादित नसून जलस्रोतांचे दीर्घकालीन संवर्धन सुनिश्चित करणारा आहे.

**जलसंधारण दिनातून राज्यव्यापी लोकचळवळ**

महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्राला दूरदृष्टी आणि व्यापक दिशा देणारे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने राज्यात १५ ते २१ ऑगस्ट २०२६ दरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचा महत्वाचा भाग म्हणून आज २१ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांत 'महा वॉकेथॉन २०२६ वॉक फॉर वॉटर' आयोजित करण्यात आली आहे. ''माती वाचवा , पाणी जपा , सुरक्षित भविष्य घडवा'' हा या अभियानाचा मुख्य संदेश आहे. सर्व जिल्ह्यांत ३ कि.मी. 'वॉक फॉर वॉटर' आणि सामूहिक मृद व जलसंधारण शपथ आयोजित करण्यात आली आहे. नागरिक, युवक, विद्यार्थी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांना या उपक्रमातून जलसंधारणाच्या लोकचळवळीशी जोडण्याचा प्रयत्न आहे. युवकांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देत त्यांना या लोकचळवळीशी डिजिटल माध्यमातून जोडण्यासाठी 'रील चॅलेंज' स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. माती संवर्धन, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, पाणलोट विकास आणि जलसंधारणाच्या नाविन्यपूर्ण कल्पना समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

**प्रत्येक थेंब जपूया, महाराष्ट्र जलसमृद्ध करूया**

जलसंधारण ही केवळ शासनाची योजना नाही, तर शासन आणि समाजाच्या सामूहिक सहभागातून यशस्वी होणारी लोकचळवळ आहे. शासन योजना आखू शकते, निधी उपलब्ध करून देऊ शकते, जलसंधारणाची कामे उभी करू शकते; पण त्या जलस्रोतांचे संवर्धन आणि पाण्याचा जबाबदारीने वापर करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे. शासनाचे दूरदृष्टीचे धोरण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रभावी नेतृत्व, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे सहकार्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर जलसमृद्ध, दुष्काळमुक्त आणि शाश्वत महाराष्ट्र घडविण्याचा आपला संकल्प अधिक दृढ होत आहे. जलसंधारण दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव ठरू नये. तो प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनातील संकल्प बनला पाहिजे. घरातील पाणी असो, शेतातील पाणी असो किंवा गावातील जलस्रोत- प्रत्येक थेंब जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. चला, जलसंधारण दिनानिमित्त आपण सर्वजण संकल्प करूया

पाणी अडवूया पाणी जिरवूया
माती वाचवूया पाणी जपूया
आणि जलसमृद्ध, दुष्काळमुक्त महाराष्ट्र घडवूया!

# पान १ वरुन...

### आजी - माजी...

जालना शहरातील बेरोजगार तरुणांसाठीही या पदभरतीकडे मोठी संधी म्हणून पाहिले जात आहे. म्हणूनच सध्या सुरू असलेल्या श्रेयवादापेक्षा प्रत्यक्ष भरती कधी सुरू होते, किती पदे पहिल्या टप्प्यात भरली जातात आणि प्रक्रिया किती पारदर्शकपणे राबविली जाते, हे अधिक महत्त्वाचे आहे.

आमदार विरुद्ध माजी आमदार, भाजप विरुद्ध विरोधक आणि आता महापौर-उपमहापौरांची श्रेयवादातील एन्ट्री, यामुळे ९९३ पदांचा विषय केवळ प्रशासकीय न राहता राजकीय बनला आहे. मात्र, जर १४ ऑगस्टच्या निवेदनानंतर शासन निर्णयाला गती मिळाली असल्याचे दस्तऐवजांमधून स्पष्ट झाले, तर 'श्रेयासाठी सुरू असलेल्या या लढाईत महापौर वंदना मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांनी प्रत्यक्ष निर्णयाच्या उंबरठ्यावर मुद्दा मांडून सरशी केली', असे म्हणण्यास निश्चितच वाव राहणार आहे.

शेवटी श्रेय कोणाचेही असो; ९९३ पदांवर गुणवत्ताधारित आणि पारदर्शक भरती होऊन जालना महापालिका सक्षम झाली, तर त्याचे खरे श्रेय जालनेकरांनाच मिळणार आहे.

### एमपीडीएअंतर्गत..

तयार करणारी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार लक्ष्मीबाई रमेश पवार हिच्याविरोधात एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाईचा प्रस्ताव तयार केला.

हा प्रस्ताव उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्या माध्यमातून जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडे पाठविण्यात आला होता. प्रस्तावाचे अवलोकन केल्यानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दि. २७ जानेवारी २०२६ रोजी लक्ष्मीबाई पवार हिला एक वर्षासाठी मध्यवर्ती कारागृह हर्सल, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबद्ध करण्याचे आदेश जारी केले होते.

मात्र, आदेश झाल्यानंतर संबंधित महिला पोलिसांना चकवा देत फरार झाली होती. त्यामुळे कदीम जालना पोलिसांकडून तिचा शोध सुरू होता. तिच्या संभाव्य ठिकाणांवर लक्ष ठेवण्यात येत होते. दरम्यान, दि. २० ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास लक्ष्मीबाई पवार आपल्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी घरी येणार असल्याची खात्रीलायक माहिती पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांना मिळाली. माहिती मिळताच त्यांनी स्वतः तसेच कदीम जालना पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांच्या मदतीने मोतीबाग परिसरात सापळा रचला. लक्ष्मीबाई पवार आपल्या घराच्या दिशेने जात असताना पोलिसांनी योग्य संधी साधून तिला शिताफीने ताब्यात घेतले. त्यानंतर एमपीडीए कायद्यानुसार तिच्यावर स्थानबद्धतेची पुढील कार्यवाही करण्यात आली. तिला मध्यवर्ती कारागृह हर्सल, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे.

जालना शहरात अवैध हातभट्टी दारू निर्मिती आणि विक्रीसह समाजविघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. सराईत गुन्हेगारांवर एमपीडीएसारख्या कठोर कायद्यांतर्गत कारवाई करून त्यांच्या हालचालींवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न पोलिसांकडून केला जात आहे.

या कारवाईमुळे एमपीडीएचा आदेश होऊनही फरार राहणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन त्यांना स्थानबद्ध करण्याच्या पोलिसांच्या कारवाईला महत्त्व प्राप्त झाले आहे. विशेषतः कुटुंबीयांना भेटण्यासाठी आरोपी घरी येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी आखलेला सापळा यशस्वी ठरला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव, पोलीस हेड कॉन्स्टेबल सदा राठोड, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल शुभदा पाईकराव, पोलीस कॉन्स्टेबल संदीप चव्हाण आणि कृष्णा चव्हाण यांनी केली.

### जालन्यात अवैध...

आला आहे. तिसऱ्या कारवाईत पवन बबन कसबे (वय २३, रा. ख्रिस्ती कॅम्प, जालना) हा धारदार तलवारी बाळगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी ख्रिस्ती कॅम्प परिसरातून त्याला ताब्यात घेत त्याच्या राहत्या घरातून दोन धारदार व तीक्ष्ण तलवारी जप्त केल्या. या तलवारींची किंमत तीन हजार रुपये असून, याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या तीन कारवायांमध्ये पोलिसांनी एकूण ५८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यामध्ये प्रथमेश कदम याच्याकडील ३५ हजार रुपयांचे गावठी पिस्टल, राजेश पांजगे याच्याकडील २० हजार रुपयांचा देशी रिव्हॉल्व्हर आणि पवन कसबे याच्याकडील तीन हजार रुपये किमतीच्या दोन तलवारींचा समावेश आहे.

जालना शहर आणि जिल्ह्यात अलीकडच्या काळात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर पोलिसांकडून सातत्याने कारवाई केली जात आहे. पिस्टल, रिव्हॉल्व्हर, तलवारी यांसारखी शस्त्रे विनापरवाना बाळगली जात असल्याचे प्रकार समोर येत असल्याने पोलिसांच्या या कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. एकाच दिवशी तीन तरुणांकडून वेगवेगळ्या प्रकारची शस्त्रे जप्त झाल्याने शहरातील अवैध शस्त्रांच्या उपलब्धतेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. जप्त करण्यात आलेली ही शस्त्रे आरोपींकडे नेमकी कुठून आली, त्यांचा वापर कोणत्या कारणासाठी केला जाणार होता आणि या शस्त्रांच्या पुरवठ्यामागे आणखी कोणी व्यक्ती आहे का, या दिशेने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, सॅम्युअल कांबळे, गोपाल गोशिक, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, आक्रुर धांडगे, शिवप्रसाद एंखडे, बाबासाहेब गायकवाड, रमेश काळे, योगेश सहाने, धीरज भोसले, सोपान क्षीरसागर, रेणुका बांडे आणि अरुणा गायकवाड यांच्या पथकाने केली.

### 'विश्वमंगल'च्या...

कामकाजाची माहिती देताना बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळत असल्याचे सांगितल्याचा दावा तिने केला आहे. संस्थेच्या नावाने २८ कल्याणकारी योजनांची माहिती असलेली विशेष नोंदणी अभियानाची पत्रकेही वाटण्यात आली होती, असे तक्रारीत नमूद आहे.

तक्रारदार महिलेच्या म्हणण्यानुसार, तिला संस्थेमध्ये साखळी पद्धतीने बांधकाम कामगार सदस्य जोडण्याचे काम देण्यात आले. या कामाच्या मोबदल्यात दरमहा १० हजार रुपये पगार देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनावर विश्वास ठेवून संबंधित महिला संस्थेच्या कार्यालयात काम करण्यासाठी गेली. जालना येथील संभाजीनगर परिसरातील कार्यालयात तिने सप्टेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत काम केल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. या कालावधीत आपण संस्थेसाठी अंदाजे २ हजार नवीन बांधकाम कामगार सदस्य जोडले, असे तक्रारदार महिलेने पोलिसांना दिलेल्या जबाबात म्हटले आहे.

प्रत्येक सदस्याकडून ₹१,००० प्रमाणे एकूण ₹२० लाख रुपये जमा करून ते संतोष रामभाऊ इंगळे यांच्याकडे रोख स्वरूपात दिल्याचा दावा तिने केला आहे. ही रक्कम संबंधित सदस्यांच्या नोंदणीच्या माध्यमातून जमा झाल्याचे तक्रारीत म्हटले असून, प्रत्यक्षात या संस्थेची वैधता आणि जमा केलेल्या रकमेचा वापर याबाबत आता पोलिस तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

तक्रारीतील आणखी गंभीर आरोप म्हणजे संबंधित महिलेच्या नावाने 'विश्वमंगल असंघटित कामगार महासंघ' या नावाचे ओळखपत्र तयार करण्यात आल्याचा दावा.

संतोष रामभाऊ इंगळे यांनी तिचे नाव 'संस्थापक व अध्यक्ष' म्हणून नमूद असलेले ओळखपत्र छापल्याचे तक्रारदार महिलेने म्हटले आहे. मात्र, आपण केवळ कार्यालयात सदस्य नोंदणीचे काम करत होतो, असा तिचा दावा आहे.

या ओळखपत्राची निर्मिती कोणत्या उद्देशाने करण्यात आली, ते अधिकृत होते का, संस्थेची नोंदणी नेमकी कोणत्या नावाने व कोणत्या कायदेशीर स्वरूपात झाली होती, याची पडताळणी तपासात होणे आवश्यक आहे. तक्रारदार महिलेने सप्टेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संस्थेच्या कार्यालयात काम केल्याचे म्हटले आहे. मात्र, आश्वासन दिल्याप्रमाणे दरमहा ₹१० हजार पगार मिळाला नाही, असा आरोप तिने केला आहे. पगाराची मागणी केल्यानंतर संबंधितांकडून उडवाउडवीची उत्तरे मिळाल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर तिने संस्थेबाबत इतर ठिकाणी चौकशी केली असता संस्था बोगस असल्याचे समजल्याचा दावा तिने पोलिसांना दिलेल्या जबाबात केला आहे.

संस्थेच्या माध्यमातून जमा करण्यात आलेली रक्कम आणि स्वतः चा थकीत पगार परत मिळावा, अशी मागणी तक्रारदार महिलेने संबंधितांकडे केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

आपण जोडलेल्या सदस्यांकडून जमा केलेले ₹२० लाख रुपये परत द्यावेत, अशी मागणी केल्यानंतरही संबंधितांनी पैसे परत केले नाहीत. उलट उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली, असा आरोप तिने केला आहे.

या प्रकरणात केवळ तक्रारदार महिलेचीच नव्हे तर इतर कामगारांचीही आर्थिक फसवणूक झाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे पोलिस तपासात अशा सदस्यांची संख्या किती आहे आणि प्रत्यक्षात किती रक्कम जमा करण्यात आली, हे स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे. तक्रारदार महिलेच्या म्हणण्यानुसार, तिने वारंवार संबंधित तिघांकडे पीडित महिलांचे पैसे परत देण्याची मागणी केली. त्यानंतर ९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता संबंधित तिघांनी तिला शिवीगाळ केली आणि 'तुझे कशाचे पैसे, कशाचा पगार, तुझ्यासारखे खूप पाहिले, जा तुला काय करायचे ते कर', अशा स्वरूपाची धमकी दिल्याचा आरोप तिने केला आहे. या घटनेनंतर तिने सदर बाजार पोलिस ठाण्यात धाव घेत संबंधितांविरुद्ध कायदेशीर तक्रार दाखल केली.

पोलिस नोंदीनुसार या प्रकरणात भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३५१(२), ३५२ आणि ३(५) यांचा समावेश आहे. यातील कलम ३१८ हे फसवणुकीशी संबंधित आहे, तर कलम ३५१ धमकीशी संबंधित आहे. कलम ३५२ शिवीगाळ/अपमानाच्या स्वरूपाच्या कृत्याशी संबंधित आहे. कलम ३(५) हे सामायिक हेतूशी संबंधित तरतूद आहे. मात्र, गुन्हा दाखल होणे म्हणजे आरोप सिद्ध होणे नव्हे. तक्रारीतील आरोपांची सत्यता, संस्थेची कायदेशीर स्थिती, सदस्यांकडून प्रत्यक्षात किती रक्कम जमा करण्यात आली आणि ती रक्कम कुठे वापरण्यात आली, याचा तपास पोलिसांकडून होणे अपेक्षित आहे.

**'२८ कल्याणकारी योजना' नेमक्या कोणत्या?**

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा तपासाचा मुद्दा म्हणजे संबंधित संस्थेने बांधकाम कामगारांसाठी ज्या २८ कल्याणकारी योजनांचे पत्रक दाखविल्याचे तक्रारीत म्हटले आहे, त्या योजना नेमक्या कोणत्या होत्या आणि त्या कोणत्या शासकीय अथवा वैधानिक यंत्रणेशी संबंधित होत्या, हा आहे.

जर शासकीय योजनांचे नाव, लोगो अथवा योजनांच्या लाभाचे आमिष दाखवून सदस्यांकडून पैसे जमा केले असतील, तर या बाबीचीही स्वतंत्र चौकशी आवश्यक ठरू शकते.

तक्रारदार महिलेच्या दाव्यानुसार २ हजार सदस्यांकडून प्रत्येकी ₹१ हजार याप्रमाणे ₹२० लाख रुपये जमा करण्यात आले. ही रक्कम रोख स्वरूपात दिल्याचेही तिने म्हटले आहे.

त्यामुळे पोलिस तपासात सदस्य नोंदणीचे रजिस्टर, पावत्या, सदस्यांकडून घेतलेल्या रकमेची नोंद, बँक व्यवहार, कार्यालयीन कागदपत्रे, ओळखपत्रे, पत्रके आणि संस्थेच्या नोंदणीशी संबंधित कागदपत्रे तपासली जाण्याची शक्यता आहे.

तसेच या संस्थेच्या माध्यमातून जालना जिल्ह्यात किंवा इतर भागांत आणखी किती कामगारांची नोंदणी करण्यात आली, त्यांच्याकडून किती रक्कम घेण्यात आली आणि त्यांना कोणते लाभ मिळाले, याचाही तपास झाल्यास प्रकरणाची व्याप्ती स्पष्ट होऊ शकते.

**पोलिस तपासाकडे लक्ष**

या प्रकरणात तक्रारदार महिलेने केलेले आरोप गंभीर स्वरूपाचे असल्याने आता पोलिस तपासात संस्थेची खरी ओळख, नोंदणीची वैधता, आर्थिक व्यवहार, सदस्यांची संख्या आणि संबंधित तिघांची भूमिका याबाबत काय निष्पन्न होते, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

विशेषतः 'दोन हजार सदस्यांकडून २० लाख रुपये' हा दावा प्रत्यक्ष कागदपत्रे व आर्थिक व्यवहारातून सिद्ध होतो का, तसेच या रकमेचा पुढे काय वापर झाला, याचा तपास झाल्यानंतरच प्रकरणाचे संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे.

### युनिसेफ इंडियाचे राष्ट्रीय राजदूत आयुष्मान खुराना यांनी केले मुलांच्या सुरक्षित बालपणाचे आवाहन

# ऊसतोड हंगामी स्थलांतराचा परिणाम झालेल्या मुलांसाठीच्या ‘कुटुंब आणि समुदाय आधारित काळजी व संरक्षण’’या युनिसेफ कार्यक्रमाला भेट

**जालना – प्रतिनिधी**

-: युनिसेफ इंडियाचे राष्ट्रीय राजदूत आणि आयुष्मान खुराना प्रसिद्ध अभिनेते यांनी (दि. १९) रोजी जालना येथे भेट देऊन, ऊसतोड हंगामी स्थलांतराचा परिणाम झालेल्या मुलांसाठी राबवण्यात येणाऱ्या ‘‘कुटुंब आणिसमुदायआधारित काळजी व संरक्षण’’ या युनिसेफ कार्यक्रमाला भेट देऊन मुले आणि उपस्थितांशी संवाद साधला. खुराना यांच्यासोबत युनिसेफ इंडियाच्या पथकात उप प्रतिनिधी (कार्यक्रम) यास्पर मोलर यांचा समावेश होता. या मोहिमेला राज्य सरकार आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांचे सहकार्य आहे. अनेक उपेक्षित कुटुंबांसाठी, आर्थिक अडचणींमुळे हंगामी स्थलांतर ही वास्तविकता आहे. यामुळे मुलांसाठी बालमजुरी, बालविवाह, शिक्षणात खंड, कौटुंबिक दुर्लक्ष आणि हिंसाचाराचा धोका वाढू शकतो. पालकांच्या अनुपस्थितीत काही वेळा विस्तारित कुटुंबासह किंवा आजी-आजोबांसोबत मागे राहणारी मुले शाळेत जातात किंवा त्यांना आरोग्य सेवाही मिळतात. परंतु, त्यांना अनेकदा भावनिक पाठिंबा मिळत नाही, घरातून दुर्लक्ष होण्याची शक्यता वाढते आणि घरगुती जबाबदाऱ्या अंगावर पडतात.

या समस्यांचे निराकरण करणाऱ्या आणि हिंसाचार, अत्याचार, शोषण व कौटुंबिक दुर्लक्ष रोखण्यासाठी तसेच बाल संरक्षण व्यवस्था बळकट करण्यासाठी युनिसेफ भारत सरकारसोबत काम करते. जालन्यात, जिल्हा प्रशासन आणि स्वयंसेवी संस्था यांच्या

सहकार्याने ‘‘कुटुंब आणि समुदायआधारित काळजी व संरक्षण’’ (किनशिप अँड कम्युनिटी केअर) कार्यक्रम राबवला जातो. या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्थानिक रहिवासी आणि सरकार यांनी एकत्र काम केल्यामुळे स्थलांतरित पालकांच्या मुलांसाठी सुरक्षित वातावरण, शिक्षणात खंड न पडणे या गोष्टी शक्य झाल्या आहेत. तसेच आरोग्यसेवा, पोषण व मानसिक-सामाजिक आधार यांसारख्या सेवाही मुलांसाठी उपलब्ध झाल्या असून बालमजुरी आणि बालविवाहाचा धोकाही कमी होण्यास मदत झाली आहे.

;हंगामी, आर्थिक अडचणींमुळे होणारे स्थलांतर हा स्वखुशीने निवडलेला पर्याय नसून अनेक कुटुंबांसाठी ते कठोर वास्तव आहे,; असे मत आयुष्मान खुराना यांनी मुले आणि स्थानिक सदस्यांची भेट घेतल्यानंतर व्यक्त केले. ;कोणत्याही मुलाला त्याच्या आवाक्यात नसलेल्या परिस्थितीमुळे आपले बालपण गमवावे लागू नये. जालन्यात, मी स्थानिक रहिवाशांना एकत्र येऊन स्थलांतरामुळे प्रभावित झालेल्या मुलांना संरक्षण देताना आणि त्यांना कुटुंबाशी जोडून घेऊन काळजी घेताना पाहिले. हा कार्यक्रम केवळ सुरक्षित घर पुरवत नाही तर नातेसंबंधही जपतो, मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करतो आणि मुलांना उज्ज्वल भविष्याची

आशा देते.; खुराना यांनी शंकर आसाराम या तरुण समुदाय नेत्याची भेट घेतली. शंकर यांनी युवा स्वयंसेवक म्हणून केलेल्या कामामुळे त्यांना स्थानिकांचा विश्वास संपादन करता आला. त्यांच्या कामामुळेच आज ते एका गावाचे सरपंच म्हणून निवडून आले आहेत.

खुराना यांनी बारावीत शिकणारी विद्यार्थिनी आणि बालमित्र असलेल्या प्रतिक्षा हिचीही भेट घेतली. प्रतिक्षाने स्थलांतराचा किशोरवयीन मुलींवर होणारा परिणाम प्रत्यक्ष पाहिला आहे.

;बालमित्र हे मुलांसाठी आणि स्थानिकांसाठी विश्वासार्ह आणि उत्तम आदर्श आहेत. मुलांचे हक्क, सुरक्षितता आणि कल्याण तसेच मुलांच्या शिक्षणात खंड न पडण्यासाठी, बालमजुरी आणि बालविवाह रोखण्यासाठी ते मदत करतात. त्यामुळे प्रत्येक मुलाला शिकण्याची आणि यशस्वी होण्याची संधी मिळते. भारतात मुलांच्या संरक्षणासाठी बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) सारखे मजबूत कायदे आहेत. या वर्षी या कायद्याला दहा वर्षे पूर्ण होत आहेत. आता महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे संरक्षणात्मक उपाय हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांसह प्रत्येक मूल आणि इतर कुटुंबापर्यंत प्रत्यक्षात पोहोचतील याची खात्री करणे,; असे आयुष्मान खुराना म्हणाले. ग्रामपंचायती आणि आघाडीच्या सेवा पुरवठादारांना एकत्र आणून, हा कार्यक्रम मुलांसाठी एक सामाजिक सुरक्षा तयार

करतो. त्या माध्यमातून मुलांना शिक्षण, आरोग्यसेवा, पोषण आणि मानसिक-सामाजिक आधार दिला जातो. गावपातळीवर हा कार्यक्रम मुलांना कसा आधार देतो हे समजून घेण्यासाठी खुराना यांनी किशोरवयीन मुली, मुले आणि काही कुटुंबांची भेट घेतली. किशोरवयीन मुलींशी झालेल्या संवादाबद्दल बोलताना खुराना म्हणाले की, ;मी १८ वर्षांच्या शिल्पाला भेटलो. तिला कुटुंबासोबत स्थलांतराचा अनुभव आहे. पण आज तिने शालेय शिक्षण पूर्ण करून व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे. तिचे शिक्षणच तिला हंगामी स्थलांतराचे पिढ्यानपिढ्या चालणारे चक्र मोडण्यास मदत करू शकेल अशी आशा आहे. शिक्षणासाठी योग्य, निरोगी आणि सुरक्षित वातावरणात दिल्यास मुलींची स्वप्ने नक्की पूर्ण होऊ शकतात.;

पालकांच्या स्थलांतरानंतर आजोबा आपल्या दोन नातवंडांची काळजी घेत असलेल्या एका कुटुंबाचीही खुराना यांनी भेट घेतली. बालमित्र आणि स्थानिकांच्या मदतीने ही मुले शाळेत जातात. त्यामुळे आरोग्याशी संबंधित पोषण व लसीकरण सेवाही त्यांना मिळतात.

आपल्या भेटीबद्दल सांगताना खुराना म्हणाले की, ;प्रत्येक मुलाला सुरक्षित, प्रेमळ आणि पोषक कौटुंबिक वातावरणात वाढण्याचा हक्क आहे. सरकार मुलांच्या संरक्षणासाठी कायदे आणि योजना तयार करते. त्याचवेळी युनिसेफ, महाराष्ट्र सरकार, जिल्हा प्रशासन आणि गावातील रहिवासी एकत्र येऊन प्रत्येक मूल सुरक्षित राहील यासाठी काळजी घेताना पाहून मला त्यांचा अभिमान वाटतो.; ;सर्वाधिक असुरक्षित मुलांना सुरक्षित आणि पोषक वातावरण पुरवण्यात जालना जिल्हा प्रशासनाला साथ देताना युनिसेफला आनंद होत आहे,; असे युनिसेफ इंडियाचे यास्पर मोलर म्हणाले. ;मुलांवरील हिंसाचार रोखला जाऊ शकतो. बाल न्याय

(काळजी आणि संरक्षण) कायदा २०१५ ला दहा वर्षे पूर्ण होत आहेत. अशावेळी मुलांच्या आयुष्यात असलेले धोके वेळीच ओळखणे आणि कुटुंबांना आवश्यक सेवा देणे गरजेचे आहे. तसेच मुलांना सामाजिक संरक्षणाशी जोडण्यासाठी व्यवस्था अधिक बळकट करणेही

महत्त्वाचे आहे. या कामासाठी सहकार्य देणाऱ्या आणि प्रत्येक मुलाच्या सुरक्षितता व काळजी या हक्कांसाठी पुढाकार घेणाऱ्या आयुष्मान खुराना यांचेही युनिसेफ मनः पूर्वक कौतुक करते.;

यावेळी अभिनेते आयुष्यमान खुराना आणि युनिसेफ इंडियाच्या यास्पर मोलर यांनी जालना जिल्हाधिकारी आशिमा

मित्तल यांची भेट घेतली. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जालना जिल्ह्यात युनिसेफच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या ‘बालमित्र’ उपक्रमाची माहिती दिली. तसेच या उपक्रमाचा मुख्य उद्देश स्थलांतरित कुटुंबातील मुलांना शिक्षणाच्या

प्रवाहात कायम ठेवणे असल्याचे सांगितले. ऊसतोडणी किंवा मजुरीसाठी पालक स्थलांतरित झाल्यानंतर काही मुले गावात आजी- आजोबा किंवा नातेवाईकांकडे राहतात. त्यावेळेस ‘बालमित्र’ हे युवा स्वयंसेवक अशा मुलांना शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि मानसिक आधार देत असल्याची माहिती दिली.

# ग्रामीण भागात उत्कृष्ट नेत्रचिकित्सा मिळवून देण्यासाठी लायन्स परिवार कटिबद्ध-बियाणी

### लायन्स क्लबची आता बीड जिल्ह्यात नेत्र सेवा; शिरसाळा येथे आय केअर व्हिजन सेंटरचा शुभारंभ

**जालना - प्रतिनिध**

मानव कल्याणाच्या उद्देशाने स्थापन झालेली लायन्स इंटरनॅशनल ही संस्था आता ग्रामीण भागातील तळागाळातील रुग्णांपर्यंत पोहोचत आहे. गरजू रुग्णांना माफक दरात उत्कृष्ट नेत्रचिकित्सा आणि उपचार मिळवून देण्यासाठी लायन्स परिवार कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन लायन्स प्रांत ३२३४ एच २ चे गॅट कॉर्डिनेटर सुनील बियाणी यांनी केले.



लायन्स क्लब ऑफ परतूर ग्रामीण भागातील रुग्णांपर्यंत दर्जेदार व अल्पदरात नेत्रसेवा पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील असून, वर्षभरापूर्वी बीड येथे मातोश्री लॉयन्स नेत्रालय कार्यान्वित करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुके आणि मोठ्या बाजारपेठेच्या गावात नेत्र चिकित्सा करून बीड येथील नेत्रालयात गरजू रुग्णांची

माफक दरात आणि मोफत मोतीबिंदू व तत्सम नेत्रशस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. या नेत्रालयांतर्गत बीड जिल्ह्यातील शिरसाळा (ता. परळी) येथे श्री गणेश आय केअर व्हिजन सेंटरचे उद्घाटन सुनील बियाणी यांच्याहस्ते संपन्न झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परतुर येथील दृष्टी लायन्स नेत्रालयाचे संस्थापक अध्यक्ष मनोहर खालापुरे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून लायन्स आय क्लब परतूरचे अध्यक्ष महेश होलानी, मातोश्री लायन्स नेत्रालय बीडचे अध्यक्ष बाळासाहेब बेद्रे, शिरसाळ्याचे सरपंच नजीरभाई शेख, श्रीकृष्ण मल्टिस्पेशालिटी डेंटल क्लिनिकचे डॉ. कृष्णा फड, जालना लायन्स फाउंडेशनचे कोषाध्यक्ष रतन बजाज आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात मनोहर खालापुरे यांनी डोळ्यांच्या विविध आजारांचे गांभीर्य स्पष्ट करत मराठवाड्यातील लायन्सच्या नेत्र सेवेचा आढावा मांडला. ते म्हणाले की, मराठवाड्यात लायन्सचे ७ ते ८ अद्ययावत हॉस्पिटल्स अविरतपणे कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या शहरांत न जाता स्थानिक पातळीवरच डोळ्यांची तपासणी व्हावी, या हेतूने शिरसाळा येथे हे व्हिजन सेंटर सुरू करण्यात आले आहे. येथे केवळ ५० रुपयांत अत्याधुनिक संगणकीय तपासणी होणार असून मोतीबिंदू व इतर शस्त्रक्रिया बीड येथील मातोश्री लायन्स नेत्रालयात अत्यंत माफक दरात केल्या जातील.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्हिजन सेंटरचे ऑप्थोलॉजिस्ट गौरव शिंदे यांनी केले. शिरसाळा परिसरातील नागरिकांनी या माफक दरातील सर्वसमावेशक नेत्र तपासणी व उपचार सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास परिसरातील नागरिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घर खरेदीदारांचे हित जपल्याशिवाय जामीन नाहीः सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

**जालना - प्रतिनिधी**

घर खरेदीदारांची फसवणूक करून जमवलेल्या पैशाचा गैरवापर केल्याच्या आरोपाखाली दाखल असलेल्या गुन्ह्यात, सर्वोच्च न्यायालयाने माजी आमदार धरम सिंह छोकर यांना जामीन देण्यापूर्वी फसवणूक झालेल्या घर खरेदीदारांचे हित जपण्याचे निर्देश दिले आहेत. जोपर्यंत याचिकाकर्ते घर खरेदीदारांच्या हिताचे रक्षण करत नाहीत, ज्यांची प्रथमदर्शनी फसवणूक झाली आहे, तोपर्यंत या न्यायालयाने याचिकेतील प्रार्थनेचा विचार का करावा, याचे कारण याचिकाकर्त्याने दाखवावे, असा महत्त्वपूर्ण आदेश न्यायालयाने दिला. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला, ज्यामुळे आर्थिक गुन्हेगारीतील आरोपींना जामीन मिळणे अधिक कठीण झाले आहे. या निकालामुळे पीडितांना न्याय मिळण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, असे मत नोटरी असोसिएशनचे कार्यकारी अध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केले. सदर प्रकरण हरियाणातील माजी आमदार धरम सिंह छोकर आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या नियंत्रणाखाली असलेल्या माहिरा ग्रुपच्या एका गृहनिर्माण प्रकल्पाशी संबंधित आहे. या प्रकल्पामध्ये घर खरेदीदारांकडून जमा केलेल्या मोठ्या रकमेचा गैरवापर आणि हस्तांतरण झाल्याचा आरोप आहे. फिर्यादी पक्षाच्या म्हणण्यानुसार, छोकर आणि सह-आरोपींनी मिळून सुमारे ६१६ कोटी रुपयांच्या गुन्हेगारी उत्पन्नाचा अपहार केला. या प्रकरणी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने छोकर यांना नियमित जामीन नाकारला होता, ज्याला त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने आपल्या निरीक्षणात म्हटले होते की, आरोप, व्यवहारांचे स्वरूप आणि तपासादरम्यान गोळा केलेले साहित्य पाहता, छोकर यांना या टप्प्यावर सोडणे न्यायोचित नाही.

न्यायालयात छोकर यांनी युक्तिवाद केला होता की, ते एक ज्येष्ठ नागरिक असून समाजात त्यांची खोलवर मुळे आहेत, त्यांनी तपासात सहकार्य केले आहे आणि खटला चालण्यास बराच वेळ लागण्याची शक्यता आहे.

याउलट, अंमलबजावणी संचालनालयाने आरोपांचे गांभीर्य, तपासादरम्यान छोकर यांचे वर्तन आणि जामीन मंजूर करण्यासंबंधीच्या वैधानिक आवश्यकतांचा हवाला देत जामिनाला तीव्र विरोध केला. न्यायालयाने हे देखील नमूद केले की, तपासादरम्यान छोकर यांना अनेकदा समन्स बजावूनही ते हजर राहिले नाहीत आणि त्यांच्याविरुद्ध अजामीनपात्र अटक वॉरंट जारी करावे लागले होते. अखेरीस, दिल्लीतील एका हॉटेलमधून पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना त्यांना अटक करण्यात आली होती.

या निकालावर प्रतिक्रिया देताना ॲड. महेश एस. धन्नावत (धन्नावत) यांनी सांगितले की, ‘‘सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये एक नवीन आणि सकारात्मक पायंडा पाडणारा आहे. आरोपीला जामीन देण्यापूर्वी पीडितांच्या हक्कांचे संरक्षण करणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे, हे या निकालाने अधोरेखित केले आहे. यामुळे सामान्य गुंतवणूकदारांचा आणि घर खरेदीदारांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल.‘

सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेमुळे देशभरातील आर्थिक गुन्ह्यांशी संबंधित खटल्यांवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे, जिथे आरोपी जामीन मिळवण्यासाठी पीडितांच्या नुकसानीची भरपाई करण्यास जबाबदार ठरवले जाऊ शकतात. धरम सिंह छोकर विरुद्ध अंमलबजावणी संचालनालय, विशेष रजा याचिका (फौजदारी) क्रमांक ७३८३/२०२६ या प्रकरणातील हा निर्णय निश्चितच मैलाचा दगड ठरणार आहे.

# तेली समाजाचा रविवारी कोल्हापूर येथे निर्धार मेळावा

**मुंबई - प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा संघटनेने रविवार, दिनांक २३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता नष्टे लॉन , बसंत बहार रोड, उद्योग भवन समोर,न्युज शाहुपुरी, कोल्हापूर येथे तेली समाजाचा भव्य निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.यावेळी, नामदार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,माजी मंत्री विजय वडेट्टीवार , अध्यक्ष,माजी खासदार रामदास तडस, महासचिव डॉ.भूषण कर्डिले, उपाध्यक्ष गजानन शेलार, अशोक व्यवहारे,संजय विभूते ,बळवंत मोरघडे , सुनिल चौधरी उपस्थित राहणार आहेत.मेळाव्यात तेली समाजाच्या उन्नतीसाठी समाज संघटित करून एकजुटीने उभे राहिल्या शिवाय पर्याय नाही. तेली समाजाचा इतिहास कष्ट,जिद्द, चिकाटी , प्रामाणिकपणा आणि स्वाभीमानाने समृद्ध आहे.पूर्वजांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपल्या कुटुंबाचा आणि समाजाचा विकास साधला.आजच्या बदलत्या काळाचा विचार केला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते तेली समाज गुणवत्तेने , कर्तृत्वाने आणि संख्येने मोठा असूनही संघटीत शक्तिच्या अपेक्षित स्थानावर पोहोचला नाही.म्हणून महाराष्ट्रातील तेली समाज बांधवांना एकत्र आणण्याचा निर्धार कोल्हापूर जिल्हा तेली समाज संघटनेने केला आहे.तेली समाजाच्या एकजुटीचा ,स्वाभीमानाचा आणि नव्या संकल्पाचा ऐतिहासिक क्षण आहे.पुढच्या पिढीसाठी शिक्षण, रोजगार, उद्योग आणि प्रगतीच्या नव्या वाटा निर्माण करण्यासाठी महाराष्ट्रातील तेली समाज संघटित,स्वाभीमानी आणि सक्षम शक्ती पूर्ण करून महाराष्ट्रात उभा करण्यासाठी निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील तेली समाज संघटना आपल्या पदाधिकार्यांसह , सभासद आणि तेली समाज बांधवांना घेऊन सहभागी होणार असल्याचे रत्नागिरी जिल्हाध्यक्ष रघुवीर शेलार यांनी सांगितले आहे.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**

# प्राथमिक शाळा पाटोदा येथे वृक्षारोपण

**मंठा - प्रतिनिधी**

: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा येथे उपक्रमशील शिक्षक गंगाधर वानोळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण उपक्रम राबविला.

यावेळी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणातील महत्त्व, वाढते प्रदूषण रोखण्यासाठी वृक्षसंवर्धनाची गरज तसेच स्वच्छ व निरोगी पर्यावरणासाठी अधिकाधिक वृक्ष लागवड करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.



विद्यार्थ्यांनी वृक्षांची नियमित काळजी घेण्याचा संकल्प केला. याशिवाय शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक पेड मा के नाम या उपक्रमांतर्गत रोपट्यांचे रोपण करून संगोपन करणे चालू आहे.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेम, वृक्षसंवर्धनाची जाणीव आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण झाली. प्रसंगी मुख्याध्यापक व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# नऊ महिन्यांपासून वेतन रखडले; शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ

### प्रहार शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश तांदळे यांचे उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

**जालना- प्रतिनिधी**

परळी वैजनाथ येथील श्री वैद्यनाथ विद्यालयातील माध्यमिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मागील नऊ महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांसमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. वेतनाचा प्रश्न तातडीने सोडवावा, या मागणीसाठी प्रहार शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश तांदळे यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार आणि धनंजय मुंडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन मागील नऊ महिन्यांपासून थकीत असल्याने त्यांच्या




कुटुंबीयांवर आर्थिक अडचणींचा सामना करण्याची वेळ आली आहे. याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी तीन दिवसांत वेतनाचा प्रश्न सोडविण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, या आश्वासनाला एक महिना उलटूनही वेतनाचा प्रश्न मार्गी लागलेला नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वेतन रखडल्यामुळे कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामकाजावरही परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. दरम्यान, संबंधित शाळेत मागील सहा वर्षांपासून संस्थेचा नियमित मुख्याध्यापक नसल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. सेवा ज्येष्ठतेच्या निकषानुसार पात्र मुख्याध्यापकाची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे करण्यात आली होती. मात्र, अद्याप याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे तांदळे यांनी सांगितले.या प्रकरणाची दखल घेत सुनेत्राताई पवार आणि धनंजय मुंडे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना संबंधित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन देण्याबाबत आपल्या स्तरावरून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. वेतनाचा प्रश्न तातडीने निकाली काढून कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी अविनाश तांदळे यांनी केली.

# भाऊराव पाटील-भालेराव यांचे निधन

**जालना - प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील मूळ गाव बाणेगाव ह. मु. जालना येथील रहिवाशी माजी शिक्षणाधिकारी भाऊराव दाजीबा पाटील-भालेराव (८७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. भालेराव यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय सेवा बजावली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते राजु भालेराव यांचे वडील होत.



# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची अंबड नगरपरिषदेला भेट; विकासकामांसह स्वच्छता, अभिलेख व महिला बचत गटांचा घेतला आढावा

**अंबड | प्रतिनिधी**

जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल (भा.प्र.से.) यांनी गुरुवारी, २० ऑगस्ट रोजी अंबड शहराला भेट देत अंबड नगरपरिषदेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा, सुरू असलेल्या विकासकामांचा तसेच शहरातील नागरी सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी नगरपरिषद कार्यालयातील अभिलेख कक्ष, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कामकाज, हजेरी ॲप, महिला बचत गटांचे उपक्रम आणि घनकचरा व्यवस्थापनाची प्रत्यक्ष पाहणी केली.

जिल्हाधिकारी मित्तल यांच्या या भेटीमुळे अंबड शहरातील विकासकामे, स्वच्छता व्यवस्था आणि महिला बचत गटांच्या उपक्रमांना प्रशासकीय पातळीवर आवश्यक मार्गदर्शन मिळाले.

### मत्स्योदरी देवीचे दर्शन घेऊन दौऱ्याला सुरुवात

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे सकाळी अंबड शहरात आगमन झाले. अंबडला आल्यानंतर त्यांनी शहराचे श्रद्धास्थान असलेल्या श्री मत्स्योदरी देवी मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले.

त्यानंतर त्यांनी अंबड नगरपरिषद कार्यालयाला भेट दिली. नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा देवयानी केदार कुलकर्णी यांनी जिल्हाधिकारी मित्तल यांचे स्वागत केले. यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल सूर्यवंशी, पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा

नगरपरिषद कार्यालयातील बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी मित्तल यांनी नगरपरिषदेच्या विविध विभागांच्या कामकाजाची माहिती घेतली. शहरात सुरू असलेली विकासकामे, विविध शासकीय योजना आणि त्यांची अंमलबजावणी याबाबत संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून त्यांनी माहिती जाणून घेतली.

शहराच्या विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांची प्रत्यक्ष स्थिती, कामांची प्रगती आणि नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांबाबत त्यांनी आढावा घेतला.

यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी विभागनिहाय कामकाजाची माहिती जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर केली.

### अभिलेख कक्षाची पाहणी; जुन्या दस्तऐवजांच्या जतनावर भर

जिल्हाधिकारी मित्तल यांनी नगरपरिषदेतील अभिलेख कक्षाची विशेष पाहणी केली. या वेळी नगरपरिषदेतील विविध प्रकारच्या अभिलेखांचे जतन, वर्गीकरण आणि व्यवस्थापन कशा पद्धतीने केले जाते, याबाबत त्यांनी माहिती घेतली.

शासकीय कार्यालयातील जुने दस्तऐवज आणि महत्त्वाची कागदपत्रे ही प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाची संपत्ती असते. त्यामुळे अभिलेखांचे योग्य वर्गीकरण, सुरक्षित जतन आणि आवश्यकतेनुसार त्यांचा तातडीने शोध घेता येईल अशी व्यवस्था याबाबतही जिल्हाधिकाऱ्यांनी पाहणी केली.

### अधिकारी-कर्मचाऱ्यांशी संवाद

नगरपरिषद कार्यालयातील भेटीदरम्यान जिल्हाधिकारी मित्तल यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या दैनंदिन कामकाजाची माहिती घेतली. विविध विभागांमध्ये कोणत्या स्वरूपाचे कामकाज चालते, कोणत्या अडचणी येतात आणि नागरिकांना सेवा देताना कोणत्या बाबींची आवश्यकता आहे, याबाबत त्यांनी जाणून घेतले.

मुख्याधिकारी राहुल सूर्यवंशी यांनी यावेळी नगरपरिषदेतील हजेरी ॲपच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती



जिल्हाधिकाऱ्यांना दिली.

### हजेरी ॲपचीही पाहणी

नगरपरिषद प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्याच्या दृष्टीने वापरण्यात येणाऱ्या हजेरी ॲपबाबत जिल्हाधिकारी मित्तल यांनी माहिती घेतली.

हजेरीची नोंद, कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि संबंधित डिजिटल व्यवस्थेचा वापर कशा पद्धतीने केला जातो, याबाबत मुख्याधिकाऱ्यांनी त्यांना माहिती दिली.

### महिला बचत गटांच्या उत्पादनांचे कौतुक

अंबड नगरपरिषदेच्या माध्यमातून राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान () अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महिला बचत गटांच्या सदस्यांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री आयोजित करण्यात आली होती.

या प्रदर्शनास जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भेट देऊन महिला बचत गटांच्या सदस्यांनी तयार केलेल्या वस्तूंची पाहणी केली.महिलांनी स्वतःच्या हातकौशल्यातून तयार केलेले विविध प्रकारचे दैनंदिन वापरातील खाद्यपदार्थ, सणासुदीच्या काळात उपयोगी पडणारे सजावटीचे साहित्य तसेच विविध हस्तकला वस्तू प्रदर्शनात ठेवण्यात आल्या होत्या.

जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक वस्तूबाबत माहिती घेतली. वस्तू कशा तयार केल्या जातात, त्यासाठी लागणारा कच्चा माल, उत्पादनाचा खर्च, विक्रीची पद्धत आणि त्यातून महिलांना मिळणारे उत्पन्न याबाबत त्यांनी बचत गटांच्या सदस्यांशी संवाद साधला.

### 'स्वतःच्या पायावर उभे राहा'; महिलांच्या उपक्रमांना प्रोत्साहन

महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना केवळ बचत करण्याची सवय लागण्याबरोबरच स्वतःचे छोटे व्यवसाय उभारण्याची संधी मिळते. घरगुती उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध झाल्यास महिलांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते.

जिल्हाधिकारी मित्तल यांनी महिलांनी स्वतःच्या हातकौशल्यातून तयार केलेल्या वस्तूंचे कौतुक करत त्यांच्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले. उत्पादनांची गुणवत्ता, आकर्षक मांडणी आणि बाजारपेठेचा विस्तार यामुळे बचत गटांच्या उत्पादनांना अधिक ग्राहक मिळू शकतात, याकडेही लक्ष वेधले.

### नागरिकांशी थेट संवाद

नगरपरिषद कार्यालयात उपस्थित नागरिकांशीही जिल्हाधिकारी मित्तल यांनी संवाद साधला. नागरिकांनी आपल्या समस्या, सूचना तसेच विविध नागरी सुविधांशी संबंधित बाबी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

नागरिकांना कोणत्या सुविधा मिळतात, त्यांना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो आणि नगरपरिषद प्रशासनाकडून कोणत्या अपेक्षा आहेत, याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी थेट नागरिकांकडून जाणून घेतली.

या थेट संवादामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होण्यास मदत झाली.

### घनकचरा व्यवस्थापनाच्या साइटची प्रत्यक्ष पाहणी

अंबड शहरातील स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न लक्षात घेऊन जिल्हाधिकारी मित्तल यांनी घनकचरा व्यवस्थापनाच्या साइटला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

यावेळी शहरातून दररोज गोळा होणाऱ्या कचऱ्याचे संकलन, वाहतूक, विलगीकरण, प्रक्रिया आणि अंतिम व्यवस्थापन याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

कचरा संकलनानंतर त्याचे योग्य पद्धतीने विलगीकरण आणि प्रक्रिया होते का, कचऱ्याची वाहतूक कशा प्रकारे केली जाते तसेच घनकचरा व्यवस्थापनाची संपूर्ण साखळी प्रभावीपणे कार्यरत आहे का, याबाबत त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

### स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या सूचना

शहरातील स्वच्छता अधिक प्रभावी करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापनात सातत्य, नियोजन आणि योग्य पद्धतीने कचरा प्रक्रिया करणे आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन जिल्हाधिकारी मित्तल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

केवळ कचरा उचलणे हा स्वच्छतेचा अंतिम टप्पा नसून कचऱ्याचे संकलन, वाहतूक, विलगीकरण, प्रक्रिया आणि योग्य व्यवस्थापन या सर्व बाबी प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. या अनुषंगाने त्यांनी संबंधित यंत्रणेकडून माहिती घेतली.

### विकासकामांना गती देण्याचे संकेत

जिल्हाधिकाऱ्यांच्या या पाहणी दौऱ्यामुळे अंबड शहरातील विविध विकासकामांकडे जिल्हा प्रशासनाचे लक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे. नगरपरिषदेच्या विविध विभागांचा आढावा, अभिलेख व्यवस्थापन, डिजिटल हजेरी प्रणाली, महिला बचत गट आणि घनकचरा व्यवस्थापन या विविध अंगांचा एकाच वेळी आढावा घेण्यात आल्याने ही भेट प्रशासकीय दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली.

शहराच्या विकासासोबतच प्रशासनातील पारदर्शकता, स्वच्छता व्यवस्था आणि महिला आर्थिक सक्षमीकरण या तीनही बाबींवर जिल्हाधिकारी मित्तल यांनी भर दिल्याचे या दौऱ्यातून दिसून आले.

### अधिकारी, पदाधिकारी व नागरिकांची उपस्थिती

यावेळी नगराध्यक्षा देवयानी केदार कुलकर्णी, मुख्याधिकारी राहुल सूर्यवंशी, नगरपरिषदेचे सदस्य व पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी, महिला बचत गटांच्या सदस्या तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अंबड नगरपरिषद भेटीमुळे शहरातील विकासकामे, प्रशासनिक कामकाज, स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन तसेच महिला बचत गटांच्या उपक्रमांना आवश्यक प्रशासकीय मार्गदर्शन मिळाले. आता या पाहणीदरम्यान दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी कितपत वेगाने होते, याकडे अंबडकरांचे लक्ष लागले आहे.

---

# २१ ऑगस्ट रोजी आयोजित वॉकेथॉनसाठी प्रशासनाची व्यापक तयारी; मोठ्या संख्येने नागरिकांच्या सहभागाची अपेक्षा

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात २१ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य वॉकेथॉनसाठी जिल्हा प्रशासनाकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी आतापर्यंत ४ हजाराहून अधिक नागरिकांनी नोंदणी केली असून, प्रत्यक्ष कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. जिल्हाधिकारी, जालना यांच्या मार्गदर्शन व निर्देशानुसार सहभागी नागरिकांच्या सोयी-सुविधा, सुरक्षितता आणि कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन यासाठी विविध व्यवस्था करण्यात येत आहेत.

वॉकेथॉनच्या ठिकाणी सहभागींसाठी नोंदणी व चेक-इन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कार्यक्रम परिसरात आकर्षक प्रवेश कमान, आवश्यक ठिकाणी माहिती फलक, स्टँडीज, तसेच सहभागींसाठी विशेष सेल्फी स्टँड उभारण्यात येणार आहेत. वॉकेथॉनमध्ये जनजागृतीचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विविध संदेश असलेले प्लॅकार्ड्स देखील सहभागींच्या हाती असतील. कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी विशेष झुंबा उपक्रमासाठी स्वतंत्र स्टेज व आवश्यक ध्वनीव्यवस्था करण्यात येत आहे. सहभागी नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, बिस्किटे आणि केळी यांसारख्या अल्पोपहाराची योग्य व्यवस्था करण्यात आली आहे.

मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होणार असल्याने आरोग्य व सुरक्षेला विशेष प्राधान्य देण्यात आले असून, आपत्कालीन परिस्थितीसाठी रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध ठेवण्यात येणार आहे. तसेच कार्यक्रमादरम्यान वाहतूक व कायदा-सुव्यवस्था सुरळीत राहावी यासाठी पोलीस बंदोबस्त व आवश्यक सुरक्षा व्यवस्था करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार विविध विभाग आणि संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून वॉकेथॉनचे नियोजन करण्यात येत असून, हा उपक्रम नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागातून जनजागृती, आरोग्य आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा एक मोठा लोकसहभागाचा उपक्रम ठरणार आहे.

जिल्हा प्रशासनाने जालना जिल्ह्यातील सर्व नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होऊन या वॉकेथॉनला यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.

---

# जालना महानगर पालिकेचे श्रीमंत बाजीराव पेशवे चौकाच्या नूतनीकरणाकडे दुर्लक्ष

## श्रीमंत बाजीराव पेशवे जयंतीनिमित्त अभिवादन !

**जालना - प्रतिनिधी**

ब्रह्मास्त्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या ३२६ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी सर्वप्रथम माजी नगरसेवक विजय पवार यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. जगन्नाथ कातारे, अमित कुलकर्णी, सुमित कुलकर्णी, संभाजीराव नागे, रमेश गव्हाणे, अनिल



वाहूळे, अशोक सोनवणे, संजय महाराज संगमुळे, नितीन जोशी आदींची उपस्थिती होती.दरम्यान, कसबा भागातील विठ्ठल मंदिर जवळ असलेला हा चौक गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित आहे. वेळोवेळी अनेक पुढाऱ्यांनी चौकाचे नूतनीकरण व सुशोभीकरण करू असे म्हणून वेळ मारून नेली प्रत्यक्षात परिस्थिती जैसे थेच आहे. थोडक्यात या चौकाच्या नूतनीकरणाकडे महानगर पालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. काही वर्षांपूर्वी तत्कालीन नगरसेवक विजय पवार यांनी स्वखर्चातून चौकाचे नूतनीकरण केले होते. मात्र पालिकेने या चौकाचे कायमस्वरूपी सुशोभीकरण करण्याची गरज व्यक्त होत आहे.

---

# विद्यार्थांनी घेतली नशा मुक्तची शपत




**जालना - प्रतिनिधी**

आज दिनाक १९/०८/२०२६,बुधवार रोजी श्रीराम संस्कृत विद्यालय(पाठशाला),ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय व अखिल भारतीय शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठान, जालना यांचा संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थांसाठी आयोजित इयत्ता ५ वी व ६ वी च्या स्पर्धा संपन्न झाल्या.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे ब्रह्माकुमारीज्-अंबड सेवा केंद्राच्या मुख्य संचालिका बी. के.मीरादीदी, ब्रह्माकुमारीज्-जालना सेवा केंद्राच्या सहसंचालिका बी.के.अर्चनादीदी, सुरेखा बालक मंदिरचे संचालक, सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक अभय सहानी, बी. के. सुवर्णा कदम,निवृत्त नायब तहसीलदार वसंतराव देहडकर,अखिल भारतीय शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठान,जालनाचे अध्यक्ष सुधाकर भालेराव यांची उपस्थिती होती. स्पर्धा परीक्षक म्हणून सौ. अंजली बडवे व सौ.अनघा भावठाणकर यांनी काम पहिले. दिनांक-१७/००८/२०२६ रोजी झालेल्या इयत्ता ७ वी व ८ वी च्या दहा विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. बी.के. मीरादीदी व बी.के.अर्चनादीदी यांनी १० करोड नशा मुक्त भारत अभियानाची माहिती सांगितली व बी.के. सुवर्णा कदम यांनी नशा मुक्तीची प्रतिज्ञा सर्वांकडून म्हणून घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार पद्मिनी कुलकर्णी यांनी मानले.याप्रसंगी श्रीकांत शेलगावकर,कल्याणी कुलकर्णी,जयश्री कुलकर्णी,सचिन महाजन,सुर्यकांत रत्नपारखे,संदीप नेरकर,देविदास लाखोले,सिद्धू टापरे,प्रमोद बागडी,शकुंतला शेलगावकर,अश्विनी भाले, शंकर देवावाले,शैलेंद्र बदनापूरकर यासह विद्यार्थी,पालक,संस्कृत शिक्षक,वाचक वर्ग उपस्थित होता.

---

# संस्कृत भाषा व संस्कृती जपण्याचे कार्य श्रीराम संस्कृत विद्यालयाच्या माध्यमातून होत आहे - राजेश राऊत

## संस्कृत स्पर्धेला उस्फूर्त प्रतिसाद-३०४ विद्यार्थांनी सहभाग नोंदवला

**जालना - प्रतिनिधी**

दरवर्षी शालेय संस्कृत पाठांतर स्पर्धेतून संस्कृत भाषा व संस्कृती जपण्याचे कार्य श्रीराम संस्कृत विद्यालयाच्या माध्यमातून होत आहे असे प्रतिपादन श्रीराम संस्कृत विद्यालय (पाठशाळा),ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय व अखिल भारतीय शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठान,जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत दिनानिमित्ताने दिनांक - १७/०८/२०२६ रोजी आयोजित शालेय संस्कृत पाठांतर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी जालना शहर महानगरपालिकेचे उपमहापौर राजेश राऊत यांनी केले.

याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जे.ई.एस.महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश अग्निहोत्री यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे अध्यक्ष कैलास बियाणी, सचिव श्रीकांत शेलगावकर,स्पर्धा परीक्षक जयश्री कुलकर्णी व पद्मिनी कुलकर्णी यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती देवीचे पूजन करण्यात आले व




दीपप्रज्वलनाने स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

राजेश राऊत म्हणाले की, शेलगांवकर अणि आमचे पारिवारीक संबंध असून त्यातून एकमेकांना सहकार्य करत असतो. चांगले व सुंदर पाठांतर पाहूण त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना गणेश अग्निहोत्री म्हणाले की, संस्थेचे कार्य पाहूण संस्थेसोबतचा स्नेह यापूढे कायम राहिल. लहानमुलांचे पाठांतर पाहूण मला माझे बालपण आठवले. ज्या विद्यार्थ्यांना बी.एस.सी. (कम्प्यूटर सायन्स), बी.ई. (कम्प्यूटर सायन्स), आय.टी. किंवा ए.आय.चा अभ्यास करायचा आहे.

त्यांनी संस्कृत भाषा शिकावी. विद्यार्थ्यांनी लहानपणापासूनच संस्कृत भाषेचे अध्ययन करावे कारण संस्कृत भाषा ही सर्वांगावर कार्य करते. संस्कृत भाषेसाठी मागील पंच्याहत्तर वर्षापासून संस्थेतर्फे सुरु असलेल्या यज्ञाचे त्यांनी कौतूक केले, जर्मनीमध्ये सायको निरो लिंग्वेस्टीक या आधुनिक विषयावरील संशोधनात सुध्दा संस्कृत भाषेचा उपयोग होत आहे.

विद्यार्थ्यांना मुख्य संस्कृत विषय देऊन गणित, विज्ञान इतर भाषा यांचे ज्ञान दिल्या जाऊ शकत म्हणजे संस्कृतवर चांगले काम होईल. आता सध्या असलेले जास्तीत जास्त ॲप हे अलदीरीदम रायटिंगचा जो प्रकार आहे तो संस्कृतमध्ये खुप छान होतो.

२७ ऑगस्ट पर्यंत चालणाऱ्या इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी या वर्गासाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धेसाठी एकूण ३०४ शालेय विद्यार्थांनी सहभाग नोंदवला आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार पद्मिनी कुलकर्णी यांनी मानले. याप्रसंगी शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधाकर भालेराव, मनोहर कुलकर्णी,संदीप कुलकर्णी, योगेश कुलकर्णी,अमोल कुलकर्णी,प्रमोद बागडी,भाग्यश्री कुलकर्णी,कीर्ती पुराणिक, शैलेंद्र बदनापूरकर,शंकर देवावाले,महेश शेलगावकर,सोनाली दहिवाळ,दिपाली लताड,अनिता काळे,वंदना वाजे,सोनी डोंगरे यासह पालक,संस्कृत शिक्षक,वाचक वर्ग उपस्थित होता.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.